# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक – रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.४५/का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६/१२/२०१६

प्रति,
जिल्हाधिकारी,
औरंगाबाद, नांदेड, भंडारा, गडचिरोली, नागपूर व गोंदिया

विषय :- नगरपरिषदा/नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक २०१६
उमेदवारांची माहिती मतदारांना होण्याबाबत...
संदर्भ :- मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र.७१७८/२००१,
दिनांक ०२/०५/२००२

महोदय,

वरील विषयासंबंधीच्या समक्रमांकाच्या दिनांक १३/१२/२०१६ च्या पत्राद्वारे उमेदवारांनी भरलेल्या शपथपत्राची माहिती सर्व मतदारांना व्हावी यासाठी शपथपत्र प्रसिध्द करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये इतर सूचनांसोबत उमेदवारांनी सादर केलेल्या शपथपत्रामधील माहितीचा गोषवारा त्या पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये जाहीरातीच्या स्वरुपात प्रसिध्द करणे आणि हा गोषवारा प्रत्येक मतदान केंद्रासमोर त्या प्रभागापुरता लावण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या जाहीरातीमध्ये राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सोबतच्या सुधारित तक्त्यानुसार माहिती प्रसिध्द करावी (प्रत्येक उमेदवाराकरिता एक ओळ). तसेच माहितीचा गोषवारा मतदान केंद्रावर लावताना तो फ्लेक्सच्या स्वरुपात लावण्यात यावा. या फ्लेक्सचा आकार एवढा मोठा असावा की, जेणेकरुन सर्वसाधारण मतदारांना तो वाचता आला पाहिजे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,
धमाकानेड
(ध. मा. कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\DS-Kaned\नप निवडणूक नोव्हेंबर २०१६.docx.RSK

# नगरपरिषद / नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०१६

## उमेदवारांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीचा गोषवारा

प्रभाग क्र.--------- जागा क्र.---------------

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता कमाल | मालमत्ता जंगम एकूण रुपये (रु.लाखात) (स्वत:, उमेदवाराचे पती/पत्नी आणि अवलंबितांची मिळून) | मालमत्ता स्थावर एकूण रुपये (रु.लाखात) (स्वत:, उमेदवाराचे पती/पत्नी आणि अवलंबितांची मिळून) | दायित्वे / थकित रकमा (रु.लाखात) | उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांची संख्या | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |

Disclaimer (अस्वीकरण) :-

१) सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र.७१७८/२००१ (युनियन ऑफ इंडिया वि. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटीक रिफॉर्म व इतर) मधील दि.२ मे, २००२ च्या न्यायालयीन निर्णयाच्या आधारे

२) वरील गोषवारा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत दिलेल्या शपथपत्रामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे देण्यात आला आहे.

३) उमेदवारांच्या मूळ शपथपत्राची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनाफलकावर / संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्रामधील माहिती चुकीची असल्याचे वाटणाऱ्या व्यक्तीस प्रतीशपथपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करता येते.

५) त्याबाबत पोलिस तक्रार करता येते.